# नवी मुंबई महानगरपालिका

## स्थायी समिती

स्थायी समितीच्या **दिनांक १२ सप्टेंबर २०१२** रोजी भरलेल्या सभेतील **मंजूर /नामंजूर** इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसूदा स्वरुपात खालील प्रमाणे आहे:-

**विषय क्र.०१**
**१२ सप्टेंबर २०१२**

वाहन विभाग, मालमत्ता विभाग आणि योजना विभागांचा सन २०११-१२ च्या लेखा परिक्षण अहवालाबाबत, महापालिका मुख्य लेखा परिक्षकांचे दि.०६/०६/२०१२ चे पत्र क्र. नमुंमपा/लेपवि/५५/२०१२.

**ठराव क्र.६९.**
**निर्णय:-**

**वाहन विभाग आणि मालमत्ता विभागाचा लेखा परिक्षण अहवाल आयुक्तांकडे अभिप्रायासाठी तसेच योजना विभागाचा लेखा परिक्षण अहवाल पुढील सभेत घेण्यात येईल.**

**विषय क्र.०२**
**१२ सप्टेंबर २०१२**

रुपये पाच लाखापेक्षा जास्त परंतु पंचवीस लाखापेक्षा कमी खर्चाच्या कामासंबंधी केलेल्या कराराबाबत, आयुक्तांचे दि.०४/०९/२०१२ चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./८५३/२०१२.

**ठराव क्र.७०.**
**निर्णय:-**

**दफ्तरी दाखल.**

**विषय क्र.०३**
**१२ सप्टेंबर २०१२**

रुपये पाच लाखापेक्षा जास्त परंतु पंचवीस लाखापेक्षा कमी खर्चाच्या कामासंबंधी केलेल्या कराराबाबत, आयुक्तांचे दि.०१/०९/२०१२ चे पत्र क्र.नमुंमपा/सहशअ/१०९७/२०१२.

**ठराव क्र.७१.**
**निर्णय:-**

**दफ्तरी दाखल.**

**विषय क्र.०४**
**१२ सप्टेंबर २०१२**

सार्वजनिक रुग्णालय, वाशी येथील उपहारगृह चालविणे व आंतररुग्णांना भोजन पुरवठा करण्याच्या कत्रांटाबाबत, आयुक्तांचे दि.०६/०९/२०१२ चे पत्र क्र.नमुंमपा/आरोग्य/३१२१/२०१२.

ठराव क्र.७२.
१२ सप्टेंबर २०१२

"उपरोक्त विषयासंदर्भात मे.अमित कॅटरर्स यांना प्रति वर्ष रक्कम रुपये ५५,८३,५८९/- याप्रमाणे दोन वर्षाच्या कालावधीसाठी एकुण रक्कम रुपये १,११,६७,१७८/- इतक्या खर्चाने करार करण्यास सुचविल्याप्रमाणे, संमती देण्यात यावी."

**निर्णय:-**

**संमत.**